# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Illegal Property**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **09/02/2022**

**Brief of the work done :-**

रिधोरा येथे एक लाखाचा गुटखा जप्त. मालेगांव पोलीसांची कारवाई; आरोपी अटक

## रिधोरा येथे एक लाखाचा गुटखा जप्त

### मालेगांव पोलीसांची कारवाई; आरोपी अटक

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मालेगाव** ■ मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार रिधोरा फाट्याजवळ मालेगांव पोलीसांनी कारवाई केली असता हिरोहोंडा स्प्लेंडर मोटरसायकल क्र. एमएच ३७ एन ९४६३ वर सुनिल विश्वनाथ सानप वय अं. ४० वर्ष रा. ब्राह्मणवाडा ता. मालेगाव हा इसम शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, वाह, विमल, नजर, पान बहार या ब्रँड चा रू. ४९२५०/- चा माल वाहतूक करताना मिळून आला.

तसेच त्यास अधिक विचारणा केली असता त्याने दिलेल्या माहितीनुसार त्याची घराची झडती घेतली असता ब्राह्मणवाडा येथे त्यांचे राहते घरी वरील ब्रँडचा ५१००० चा प्रतिबंधित गुटखा मिळून आला. असा एकूण १००२५०/- रू. चा गुटखा व मोटर सायकल असा एकूण १६०,२५० /- रू चा मुद्देमाल आरोपी कडून जप्त करण्यात आला .

तसेच सदरचा गुटखा हा बंडू नंदलाल यादव रा. मालेगाव याने दिल्याचे आरोपी सानप याने सांगितल्याने पो. स्टे. मालेगाव येथे सुनिल सानप रा . ब्राम्हणवाडा व बंडु यादव रा मालेगांव या नमूद दोन्ही आरोपी विरुद्ध कलम १८८, १७२, २७३, ३२८, ३४ भा. द. वी. नुसार गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपी सुनील सानप यास अटक करण्यात आली आहे. अधिक तपास नारखेडे मॅडम या करीत आहेत. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, अपर पोलीस अधीक्षक श्री. गोरख भामरे, उपविभागीय पोलीस अधिकारी वाशिम सुनील कुमार पुजारी यांचे मार्गदर्शनात पो. स्टे. मालेगाव चे पोलीस निरीक्षक किरण वानखडे, सपोनी तानाजी गव्हाणे, पीएसआय सारिका नारखेडे, पोकॉ गजानन झगरे, प्रशांत वाढणकर नापोकॉ सुधीर सोळंके, विजय डोईफोडे व मालेगाव पोलीस स्टाफ यांनी केली आहे. (श.प्र)